# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विद्यापरिषदेच्या ८५ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर, २०२५ दुपारी १२:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

विद्यापरिषदेची ८५ वी तातडीची ऑनलाईन बैठक शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी १२:३० वा. मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली आहे.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | अनुपस्थित |
| ८) | डॉ. आय. जे. तांबोळी<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | अनुपस्थित |
| ९) | प्राचार्य डॉ. शशिकांत एल. तांबे<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| १०) | प्रा. (डॉ.) विकास बाबुराव पाटील<br>प्र.संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य | उपस्थित |
| ११) | प्राचार्य डॉ. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य | उपस्थित |
| १२) | प्राचार्य डॉ. सुरेश रामचंद्र ढेरे | सदस्य | उपस्थित |
| १३) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत श्रीपती सुर्यवंशी | सदस्य | अनुपस्थित |
| १४) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. सुधा गिरजाप्पा बनसोडे | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. गंगाधर धुळप्पा बिराजदार | सदस्य | अनुपस्थित |
| १७) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. श्रीमती लक्ष्मी चंद्रकांत मुशन | सदस्या | उपस्थित |
| १९) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
| --- | --- | --- | --- |
| २०) | डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे | सदस्य | अनुपस्थित |
| २१) | डॉ. तानाजी नारायण कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| २२) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| २३) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | अनुपस्थित |
| २४) | डॉ. जयंत मारुती गजभिये | सदस्य | उपस्थित |
| २५) | डॉ. धनंजय ए. जोल्हे | सदस्य | उपस्थित |
| २६) | श्री. विजय रविंद्रनाथ जवळगेकर | सदस्य | उपस्थित |
| २७) | श्री. वासुदेव रंगनाथ बंग | सदस्य | अनुपस्थित |
| २८) | डॉ. अनिल करवंदे | सदस्य | अनुपस्थित |
| २९) | डॉ. अतुल व्ही. कुलकर्णी | सदस्य | अनुपस्थित |
| ३०) | डॉ. मकरंद श्रीकृष्ण कुलकर्णी | सदस्य | अनुपस्थित |
| ३१) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर (मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्य | अनुपस्थित |
| ३२) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| ३३) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |
| ३४) | डॉ. सिद्राम रामचंद्र पुजारी<br>(अध्यक्ष - रसायनशास्त्र अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३५) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>(अध्यक्ष - सिव्हील इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३६) | डॉ. भाग्येश बलवंतराव देशमुख<br>(अध्यक्ष - मेकॅनिकल इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३७) | डॉ. विजय अनंत आठवले<br>(अध्यक्ष - कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| ३८) | डॉ. अनिल मारुती साळुंखे<br>(अध्यक्ष- हिंदी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| ३९) | डॉ. विष्णु बब्रुवान वाघमारे<br>(अध्यक्ष - इतिहास अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ४०) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-<br>सचिव | उपस्थित |

: निमंत्रित सदस्य :

| अ.क्र | निमंत्रितांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १) | डॉ. एस. डी. चव्हाण, समन्वयक, पदार्थविज्ञान अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २) | प्रा. डॉ. बी. जे. लोखंडे, समन्वयक, इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३) | विदीन कांबळे, समन्वयक, झूलॉजी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४) | डॉ. टी. आर. मगर, समन्वयक, भूगोल अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ५) | श्रीमती जे. डी. माशाळे, समन्वयक, गणित अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ६) | एम. एन. जगताप, समन्वयक, बॉटनी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ७) | डॉ. एस. एन. देशपांडे समन्वयक, मायक्रोबायोलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ८) | डॉ. आर. एस. मेंते, समन्वयक, कॉम्पुटर सायन्स अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ९) | डॉ. डी. एम. झोंबाडे, समन्वयक, सांख्यिकी आणि बायोसॅस्टीक्स अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १०) | डॉ. एस. वाय. जाधव, समन्वयक, एन्ट्रेप्रेन्युअरशिप अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ११) | डॉ. एस. पी. देशमुख, समन्वयक, ॲग्रो केमिकल्स ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १२) | डॉ. ऋषिकेश धनवे, समन्वयक, बायोटेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १३) | डॉ. एम. एस. कलशेट्टी, समन्वयक, अलाईड हेल्थ सायन्सेस अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती ए. एस. लावंड, समन्वयक, कॉसमेटिक टेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १५) | डॉ. व्ही. टी. वडेर, समन्वयक, इनवॉरमेंटल सायन्स अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १६) | डॉ. सचिन गेंगजे, समन्वयक, इलेक्टॉनिक्स इंजिनिअरींग अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १७) | व्ही. व्ही. खरात, समन्वयक, जनरल इंजिनिअरींग अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १८) | दिप्ती तांबोळी, समन्वयक, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १९) | डॉ. एम. एस. कलशेट्टी, समन्वयक, फार्मसी अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २०) | डॉ. एस. एस. शिरगन, समन्वयक, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २१) | डॉ. श्रीमती एम.ए.निरगुडे, समन्वयक, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २२) | श्रीमती ए. एन. काटगावकर, समन्वयक, बी-आर्किटेक्चर अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २३) | डॉ. अमोल बोबडे, समन्वयक, वाणिज्य अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २४) | प्राचार्य डॉ. आर. एस. ढेरे, समन्वयक, अकौटंन्सी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २५) | प्राचार्य डॉ. डी. आर. बाड, समन्वयक, बिझनेस इकॉनॉमिक्स अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २६) | प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, समन्वयक, मराठी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २७) | डॉ. मनोहर जोशी, समन्वयक, इंग्रजी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २८) | डॉ. संगमेश्वर निला, समन्वयक, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २९) | डॉ. बद्रीनाथ दामजी, समन्वयक, अर्थशास्त्र अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३०) | डॉ. गुरुसिध्दय्या स्वामी, समन्वयक, कन्नड अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |

| अ.क्र | निमंत्रितांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| ३१) | डॉ. जी. एन. शेख, समन्वयक, उर्दू/पर्शियन अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३२) | डॉ. रेवा कुलकर्णी, समन्वयक, संस्कृत अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३३) | डॉ. महावीर शास्त्री, समन्वयक, पाली/प्राकृत अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३४) | डॉ. आर. एन. जाधव, समन्वयक, ए.आय.एच.सी.ॲन्ड ए. अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३५) | डॉ. बाळासाहेब मुळीक, समन्वयक, तत्वज्ञान अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३६) | डॉ. सोपान मोहिते, समन्वयक, मानसशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३७) | डॉ. रामेश्वर मोरे, समन्वयक, समाजशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३८) | प्रा. डॉ. गौतम कांबळे, समन्वयक, ग्रामीण विकास अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३९) | डॉ. श्रीमती एस. जे. गायकवाड, समन्वयक, विधी अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४०) | कॅप्टन डॉ. महादेव थोरात समन्वयक, एन. सी. सी. अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४१) | डॉ. राजेंद्र वडजे, समन्वयक, एन. एस. एस. अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४२) | डॉ. मारोती घंटेवाड, समन्वयक, लोकप्रशासन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४३) | डॉ. सुरेश पवार, समन्वयक, शारिरीक शिक्षण अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४४) | डॉ. प्रविण आडसकर, समन्वयक, ग्रंथालय व माहितीशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४५) | डॉ. राजेंद्र गोणारकर, समन्वयक, पत्रकारिता व जनसंज्ञापन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४६) | डॉ. दुर्गेश नरपत वळवी, समन्वयक, समाजकार्य शिक्षण अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४७) | डॉ. श्रीमती अबोली सुलाखे, समन्वयक, संगीत अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४८) | डॉ. शिरीष अंबेकर, समन्वयक, ललित कला अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४९) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, समन्वयक, कौशल्य विकास अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |

स्वागत:

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, निमंत्रित सदस्य यांचे स्वागत केले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | १. दि. २८ जुलै, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ८३ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. २६ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ८४ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठरावः | १. दि. २८ जुलै, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ८३ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.<br>२. दि. २६ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ८४ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग २ या अभ्यासक्रमाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील जलदगती तुकडीच्या (प्रवेश क्षमता ६०) संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयात बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता खालीलप्रमाणे आहे.

| अभ्यासक्रम | नियमित तुकड्यांची संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| B.Sc. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ | २ | १२० |
| B.Sc. (बायोटेक्नॉलॉजी) भाग २ | १ | ६० |
| B.Sc. (बायोटेक्नॉलॉजी) भाग ३ | १ | ६० |

उपरोक्त प्रमाणे B.Sc. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ या अभ्यासक्रमाच्या नियमित अतिरिक्त तुकडीतील विद्यार्थी हे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नैसर्गिक वाढीने बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग २ साठी प्रवेशित होणार असल्याने सदर महाविद्यालयाकडून B.Sc. (बायोटेक्नॉलॉजी) भाग २ या जलदगती तुकडीचा प्रस्ताव विद्यापीठास सादर केल्यानुसार सदर जलदगती तुकडीस महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०२५/ई- १२९४०३१ /मशि-४, दि.२९/०८/२०२५ अन्वये शासन मान्यता मिळालेली आहे. सदर जलदगती तुकडीच्या संलग्निकरणाकरिता मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.) सोलापूर, विभाग, सोलापूर यांचे प्रमाणपत्र महाविद्यालयाने विद्यापीठाकडे सादर केलेले आहे.

यास्तव उक्त मान्यतेस अनुसरून सदर महाविद्यालयाच्या अतिरिक्त जलदगती तुकडीस केवळ शैक्षणिविक वर्ष २०२५-२६ साठी विद्यापीठाचे संलग्निकरण देण्यासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल सादर करण्याकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली २००९ नुसार खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली होती.

१ डॉ. प्रशांत पवार — अध्यक्ष
२ डॉ. ऋषिकेश धनवे — सदस्य
३ श्री. गिरिष कुलकर्णी — सदस्य

सदर समितीने महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून उक्त महाविद्यालयाच्या अतिरिक्त जलदगती तुकडीस (Fast Track Division) केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी संलग्निकरणास विनाअट मान्यता देण्याची शिफारस केलेली आहे.

सबब, केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग २ या अभ्यासक्रमाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील जलदगती तुकडीच्या (प्रवेश क्षमता ६०) संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग २ या अभ्यासक्रमाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील जलदगती तुकडीच्या (प्रवेश क्षमता ६०) संलग्निकरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ या अभ्यासक्रमाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील जलदगती तुकडीच्या (प्रवेश क्षमता ८०) संलग्निकरणास स्थानिक चौकशी समितीच्या अटीच्या अधिन राहून मान्यता देण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयात बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता खालीलप्रमाणे आहे.

| अभ्यासक्रम | नियमित तुकडयांची संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग १ | २ | १६० |
| बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ | १ | ८० |
| बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग ३ | १ | ८० |

उपरोक्त प्रमाणे बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग १ या अभ्यासक्रमाच्या नियमित अतिरिक्त तुकडीतील विद्यार्थी हे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नैसर्गिक वाढीने बी.एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ साठी प्रवेशित होणार असल्याने सदर महाविद्यालयाकडून बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ या जलदगती तुकडीचा प्रस्ताव विद्यापीठास सादर केल्यानुसार सदर जलदगती तुकडीस महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०२५/ई- १२९४०३१ /मशि-४, दिनांक २९/०८/२०२५ अन्वये शासन मान्यता मिळालेली आहे. सदर जलदगती तुकडीच्या संलग्निकरणाकरिता मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.) सोलापूर, विभाग, सोलापूर यांचे प्रमाणपत्र महाविद्यालयाने विद्यापीठाकडे सादर केलेले आहे.

यास्तव उक्त मान्यतेस अनुसरून सदर महाविद्यालयाच्या अतिरिक्त जलदगती तुकडीस केवळ शैक्षणिविक वर्ष २०२५-२६ साठी विद्यापीठाचे संलग्निकरण देण्यासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल सादर करण्याकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली २००९ नुसार खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रशांत पवार | अध्यक्ष |
| २ | डॉ. अनिता पुजार | सदस्य |
| ३ | श्री. गिरिष कुलकर्णी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | सदर समितीने महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून उक्त महाविद्यालयाच्या अतिरिक्त जलदगती तुकडीस (Fast Track Division) केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी संलग्निकरणास अटीच्या अधिन राहून मान्यता देण्याची शिफारस केलेली आहे.<br>सबब, केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ या अभ्यासक्रमाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील जलदगती तुकडीच्या (प्रवेश क्षमता ८०) संलग्निकरणास स्थानिक चौकशी समितीच्या अटीच्या अधिन राहून मान्यता देण्याची बाब विचारार्थ.<br>अटी: १) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता असामान्य परिस्थितीत बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ अतिरिक्त जलदगती तुकडीकरीता (८० विद्यार्थ्यांकरिता) काही संगणकांना अॅन्टी व्हायरस सॉफटवेअरची तसेच युपीएसची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. | |
| ठराव: | **केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ या अभ्यासक्रमाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील जलदगती तुकडीच्या (प्रवेश क्षमता ८०) संलग्निकरणास स्थानिक चौकशी समितीच्या खालील अटीच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**१) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता असामान्य परिस्थितीत बी. एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ अतिरिक्त जलदगती तुकडीकरीता (८० विद्यार्थ्यांकरिता) काही संगणकांना अॅन्टी व्हायरस सॉफटवेअरची तसेच युपीएसची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | श्री. वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ साठी ज्या अटींच्या अधिन राहून संलग्निकरणाची मान्यता देण्यात आली होती त्या अटीपूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या डॉ. एस. एल. तांबे यांच्या अध्यक्षतेखालील पडताळणी समितीचा अहवाल विचारार्थ.<br>टिपणी: श्री. वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाची इमारत धोकादायक स्थितीत असल्याने व याबाबत Building Structure Audit Report हा नकारात्मक असल्याने सदर अटीचे गांभीर्य लक्षात घेता, यापूर्वी डॉ. एस. एल. तांबे यांच्य अध्यक्षतेखालील पडताळणी समितीच्या अहवालास अनुसरून दि.२८/०५/२०२५ रोजीच्या विद्यापरिषद बैठकीतील ठराव क्र.१३३ (११) अन्वये ०३ जून २०२५ पर्यंत नविन इमारतीमध्ये महाविद्यालय स्थलांतर करण्यात यावे व इतर अटींची पूर्तता करण्यात यावी. नवीन जागेचे Registered Agreement करुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या स्थानिक चौकशी समितीसमोर सादर करणे या अटीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीतील विद्यार्थी पास होवून बाहेर पडले असल्याने या दोन वर्षाकरिता संलग्निकरणाची नुतनीकरणाची मान्यता देण्यात आली होती. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ संलग्निकरणाच्या नुतनीकरणासंदर्भात नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीने अटीच्या अधिन राहून केलेली शिफरस दि.०४/०६/२०२५ रोजीच्या विद्यापरिषद बैठकीत सादर केली असता ठराव क्र. ४ अन्वये सदर अटींची पूर्ततेबाबत यापूर्वी नियुक्त केलेल्या डॉ. एस. ए. तांबे यांच्या अध्यक्षतेखालील पडताळणी समितीकडून अटींची पडताळणी करणेबाबत सुचित केले होते.<br>त्याअनुषंगाने विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/संलग्नता/२०२५-२६/७२३३, दि.११/०९/२०२५ नुसार डॉ. एस. एल. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पडताळणी समितीची नियुक्ती केली होती. सदर पडताळणी समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. (अहवाल सोबत जोडल आहे.)<br>सदर अहवालानुसार सदर महाविद्यालयाने कोणत्याही अटींची पूर्तता केलेली दिसत नाही. प्राध्यापक नेमणूका झालेल्या नाहीत. सदर महाविद्यालयाचे | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | स्थलांतर पूर्णपणे झालेले नाही तसेच धोकादायक इमारतीबाबत कोणतीही उपाययोजना केल्याचे दिसून आलेले नाही. नॅक बाबतही सदर महाविद्यालय गांभीर्याने घेत नसलेबाबतची बाब निर्दशनास आलेली दिसते.<br>सबब, श्री. वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ साठी ज्या अटींच्या अधिन राहून संलग्निकरणाची मान्यता देण्यात आली होती त्या अटीपूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या डॉ. एस. एल. तांबे यांच्या अध्यक्षतेखालील पडताळणी समितीचा अहवाल विचारार्थ. | |
| ठराव: | श्री. वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास खालीलप्रमाणे समिती दि.१७/११/२०२५ रोजी पाठविण्यात येईल. | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य |
| ३) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्य |
| ४) | डॉ. डी. एम. झोंबाडे | सदस्य |

उपरोक्त समितीने महाविद्यालयास भेट देवून कार्यालयास अहवाल सादर केल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ ] | **यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (मराठी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ अन्वये स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: मा. सचिव, विद्या विकास मंडळ, करमाळा यांनी संस्थेचे संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. मराठी हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | बंद करावयाचा अभ्यासक्रम | बंद करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| विद्या विकास मंडळ, करमाळ, जि. सोलापूर | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि.सोलापूर | एम. ए. (मराठी) | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून | कायम विनाअनुदानित |

सदर महाविद्यालयातील एम. ए. (मराठी) या अभ्यासक्रमास शासन आदेश क्र.अभ्यास २००७/(११४/०७)/मशि-३, दि.१६ जून, २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळाली होती. त्याअनुरोधाने प्रस्तुत विद्यापीठाने सदर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून मान्यता दिली असून, महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रमास प्रस्तुत विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पर्यंत संलग्निकरणाच्या नूतनीकरणास मान्यता घेतली आहे.

तथापि, एम. ए. (मराठी) या अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेश अभाव व LMS प्रणालीमुळे संस्थेने संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (मराठी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

महाविद्यालय / विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकडी किंवा अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित

| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(३) अन्वये स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्याचे अधिकार विद्यापरिषदेस आहेत.<br>सबब, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (मराठी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ अन्वये स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (मराठी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ अन्वये खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.<br>तसेच समिती सदस्यांना पत्र निर्गमित झाल्यानंतर समितीचा अहवाल दि.२० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत विद्यापीठ कार्यालयास सादर करावे असे ठरले. | |

| अ.क्र. | समिती सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. आय. जे. तांबोळी | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. महेंद्र कदम | सदस्य |
| ३) | प्रा. तानाजी देशमुख | सदस्य |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६ ] | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (हिंदी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ अन्वये स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | संलग्नता विभाग |

टिपणी: मा. सचिव, विद्या विकास मंडळ, करमाळा यांनी संस्थेचे संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (हिंदी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | बंद करावयाचा अभ्यासक्रम | बंद करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| विद्या विकास मंडळ, करमाळा, जि.सोलापूर | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि.सोलापूर | एम. ए. (हिंदी) | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून | कायम विनाअनुदानित |

सदर महाविद्यालयातील एम. ए. (हिंदी) या अभ्यासक्रमास शासन आदेश क्र. अभ्यास २००७/(११४/०७)/मशि-३, दि. १६ जून, २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळाली होती. त्याअनुरोधाने प्रस्तुत विद्यापीठाने सदर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून मान्यता दिली असून, महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रमास प्रस्तुत विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पर्यंत संलग्निकरणाच्या नूतनीकरणास मान्यता घेतली आहे.

तथापि, एम. ए. (हिंदी) या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांचा अभाव व उपस्थितीसाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या LMS प्रणालीमुळे संस्थेने संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (हिंदी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरिक्त तुकडी किंवा अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(३) अन्वये स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्याचे अधिकार विद्यापरिषदेस आहेत.<br>सबब, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (हिंदी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ अन्वये स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (हिंदी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ अन्वये खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.<br>तसेच समिती सदस्यांना पत्र निर्गमित झाल्यानंतर समितीचा अहवाल **दि.२० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत विद्यापीठ कार्यालयास सादर करावे असे ठरले.** | |

| अ.क्र. | समिती सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. आय. जे. तांबोळी | अध्यक्ष |
| २) | डॉ. दादासाहेब खांडेकर | सदस्य |
| ३) | डॉ. गिरीश काशीद | सदस्य |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | **श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज संचलित ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून शासन मान्यतेच्या अनुषंगाने टप्प्याटप्याने बंद करण्यास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: मा. सहसचिव, श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांचेकडून संस्थेचे संचलित ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | बंद करावयाचा अभ्यासक्रम | बंद करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज. ता. माळशिरस, जि. सोलापूर. | ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर. | एम.सी.ए. | शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून | कायम विनाअनुदानित |

ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज, ता.माळशिरस या महाविद्यालयातील एम.सी.ए. या अभ्यासक्रमास शासन पत्र क्र. एनजीसी २००८/(२३८/०८)/मशि-३, दि.०३/०७/२००८ अन्वये महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता मिळाली होती. प्रस्तुत विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेस अनुसरुन एम.सी.ए. या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेली होती.

परंतु संस्थेला आर्थिक अडचणीमुळे ए.आय.सी.टी.ई. ची मान्यता घेणे अशक्य असल्याने, संस्थेने ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(३) अन्वये स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्याचे अधिकार विद्यापरिषदेस आहेत. परंतु विद्यापरिषदेची बैठक दि.३०/०१/२०१९ रोजी संपन्न झाली असून नजीकच्या काळात सदर बैठक आयोजित होण्याची शक्यता नव्हती व संस्थेने सदर अभ्यासक्रम बंदचा प्रस्ताव विद्यापीठाकडे दि.११/०३/२०१९ रोजी सादर केलेला होता. त्यामुळे सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्याची कार्यवाही विहित वेळेत होण्यास्तव पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकामी महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी तत्कालीन मा.कुलगुरु महोदय यांच्या अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन केलेले होते.

१. डॉ. आर. एस. मेंते (अध्यक्ष)
२. डॉ. डी. एस. सुत्रावे (सदस्य)
३. डॉ. श्रीमती ॲनी जॉन (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला होता. सदर अहवालात समितीने ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्याची शिफारस केलेली होती.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ (३)(४) मधील तरतुदीनुसार, सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बंद करण्यासंदर्भात नियुक्त स्थानिक चौकशी समितीने केलेली शिफारस दि.२०/०८/२०१९ रोजीच्या विद्यापरिषदेने ठराव क्र.१० अन्वये व्यवस्थापन परिषदेस तर दि.१९/०९/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ११(१०) नुसार शासनास शिफारस केली होती.

व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीस अनुसरुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(५) मधील तरतूदीनुसार सदर अभ्यासक्रम बंदचा प्रस्ताव मान्यतेस्तव पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०१९/७५४०, दि.०१/१०/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता.

मा. प्राचार्य, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज यांनी दि.२३/०९/२०२५ रोजीचे पत्र क्र. GFCCT/९३/२०२५-२६ अन्वये एम.सी.ए. अभ्यासक्रम बंदचे शासनाचे पत्र प्राप्त झाले असून, विद्यापीठाकडून अद्याप अभ्यासक्रम बंदचे पत्र प्राप्त झाले नसून ते मिळण्याविषयी विनंती केली आहे.

तथापि, शासनाकडून विद्यापीठाकडे सदरील अभ्यासक्रम बंदची मान्यता प्राप्त झालेली नाही. परंतु दरम्यानच्या काळात महाविद्यालयास मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.) सोलापूर विभाग यांचे कार्यासनामार्फत शासनमान्यता प्राप्त झाली असल्याचे महाविद्यालयाच्या पत्रासोबतच्या सहपत्रावरुन दिसून येते. महाराष्ट्र शासनाने शासन आदेश क्र. एनजीसी-२०२०/(०२/२०२०)/मशि-४, दि.२७/०२/२०२० अन्वये ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यास मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(५) अन्वये सदर अभ्यासक्रम बंद करण्याबाबत महाराष्ट्र शासन यांची प्राप्त झालेली मान्यता माहितीस्तव तथा सदरील अभ्यासक्रम बंदची अंतिम मान्यता महाविद्यालयास निर्गमित करणेकरिता विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.

सबब, श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज संचलित ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून शासन मान्यतेच्या अनुषंगाने टप्प्याटप्प्याने बंद करण्यास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज संचलित ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज या महाविद्यालयातील एम.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून शासन मान्यतेच्या अनुषंगाने टप्प्याटप्प्याने बंद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ८ ] | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. ए. (अर्थशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवावी की नाही याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतची बाब विचारार्थ.<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. ए. (अर्थशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. ६ मधील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) परंतुकानुसार मिळालेल्या शासन मान्यतेस अनुसरून विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसाविसो/संलग्नता/२०२५-२६/४६२९, दि.१७/०६/२०२५ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण प्राप्त झालेले आहे.<br>दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर महाविद्यालयातील नॅक व अन्य त्रुटींच्या पूर्ततेची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील त्याचप्रमाणे सदर त्रुटी पुर्तता अहवाल ०६ महिन्याच्या आत न झाल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता संबंधित विद्यापीठांनी घ्यावी. सदर मान्यता रद्द झाल्यास विद्यार्थ्यांच्या समायोजनाची कार्यवाही संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करावी. तसेच सदर पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबत कळविलेले आहे.<br>वरीलप्रमाणे कळविल्यानुसार शासनास अहवाल सादर करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत विद्यापीठाकडून सदर महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून आवश्यक ती चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे पडताळणी समितीची नियुक्ती करण्यात आली होती.<br>१ डॉ. पी. एम. पवार — अध्यक्ष<br>२ डॉ. एस. एस. राजे — विषयतज्ज्ञ<br>३ श्री. जी. ए. कुलकर्णी — अभियंता<br>उक्त पडताळणी समितीने सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठास सादर केलेला आहे. (सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे.) | संलग्नता विभाग |

| विषय (अभ्यासक्रम) | पडताळणी समितीची शिफारस | | |
|---|---|---|---|
| नवीन विषय बी. ए. (अर्थशास्त्र) भाग ३ | विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत (होय/नाही) | दिनांक ०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत (होय/नाही) | सदर अभ्यासक्रमाची मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत शासनास करावायची शिफारस |
| | होय (अटी पूर्ण) | होय (अटी पूर्ण) | शिफारस आहे |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. ए. (अर्थशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवावी की नाही याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतची बाब विचारार्थ.

ठराव: **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. ए. (अर्थशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ९ ] | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (भौतिकशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवावी की नाही याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतची बाब विचारार्थ.<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (भौतिकशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. ६ मधील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) परंतुकानुसार मिळालेल्या शासन मान्यतेस अनुसरून विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसाविसो/संलग्नता/२०२५-२६/४६२८, दि.१७/०६/२०२५ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण प्राप्त झालेले आहे.<br>दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर महाविद्यालयातील नॅक व अन्य त्रुटींच्या पूर्ततेची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील त्याचप्रमाणे सदर त्रुटी पुर्तता अहवाल ०६ महिन्याच्या आत न झाल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता संबंधित विद्यापीठांनी घ्यावी. सदर मान्यता रद्द झाल्यास विद्यार्थ्यांच्या समायोजनाची कार्यवाही संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करावी. तसेच सदर पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबत कळविलेले आहे.<br>वरीलप्रमाणे कळविल्यानुसार शासनास अहवाल सादर करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत विद्यापीठाकडून सदर महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून आवश्यक ती चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे पडताळणी समितीची नियुक्ती करण्यात आली होती.<br>१ डॉ. पी. एम. पवार — अध्यक्ष<br>२ डॉ. एस. डी. चव्हाण — विषयतज्ज्ञ<br>३ श्री. जी. ए. कुलकर्णी — अभियंता<br>उक्त पडताळणी समितीने सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठास सादर केलेला आहे. (सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे.) | संलग्नता विभाग |

| विषय (अभ्यासक्रम) | पडताळणी समितीची शिफारस | | |
|---|---|---|---|
| नवीन विषय बी. एस्सी. (भौतिकशास्त्र) भाग ३ | विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत (होय/नाही) | दिनांक ०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत (होय/नाही) | सदर अभ्यासक्रमाची मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत शासनास करावायची शिफारस |
| | होय (अटी पूर्ण) | होय (अटी पूर्ण) | शिफारस आहे |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (भौतिकशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवावी की नाही याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतची बाब विचारार्थ.

ठराव: **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (भौतिकशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (वनस्पतीशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवावी की नाही याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (वनस्पतीशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. ६ मधील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) परंतुकानुसार मिळालेल्या शासन मान्यतेस अनुसरून विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसाविसो/संलग्नता/२०२५-२६/४६३०, दि.१७/०६/२०२५ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण प्राप्त झालेले आहे.<br>दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर महाविद्यालयातील नॅक व अन्य त्रुटींच्या पूर्ततेची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील त्याचप्रमाणे सदर त्रुटी पुर्तता अहवाल ०६ महिन्याच्या आत न झाल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता संबंधित विद्यापीठांनी घ्यावी. सदर मान्यता रद्द झाल्यास विद्यार्थ्यांच्या समायोजनाची कार्यवाही संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करावी. तसेच सदर पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबत कळविलेले आहे.<br>वरीलप्रमाणे कळविल्यानुसार शासनास अहवाल सादर करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत विद्यापीठाकडून सदर महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून आवश्यक ती चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे पडताळणी समितीची नियुक्ती करण्यात आली होती.<br>१ डॉ. पी. एम. पवार — अध्यक्ष<br>२ डॉ. एम. ए. हाके — विषयतज्ज्ञ<br>३ श्री. जी. ए. कुलकर्णी — अभियंता<br>उक्त पडताळणी समितीने सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठास सादर केलेला आहे. (सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे.) | संलग्नता विभाग |

| | |
|---|---|
| | <table><tr><td>विषय (अभ्यासक्रम)</td><td colspan="3">पडताळणी समितीची शिफारस</td></tr><tr><td rowspan="2">नवीन विषय बी. एस्सी. (वनस्पतीशास्त्र) भाग ३</td><td>विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत (होय/नाही)</td><td>दिनांक ०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत (होय/नाही)</td><td>सदर अभ्यासक्रमाची मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत शासनास करावयची शिफारस</td></tr><tr><td>होय (अटी पूर्ण)</td><td>होय (अटी पूर्ण)</td><td>शिफारस आहे</td></tr></table><br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (वनस्पतीशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवावी की नाही याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतची बाब विचारार्थ. |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील बी. एस्सी. (वनस्पतीशास्त्र) भाग ३ या नवीन विषयास दि.१५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील, दि.०२/०९/२०२४ रोजीच्या शासन पत्रातील तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रथम संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण दिले होते, त्या अटींच्या पूर्ततेची पडताळणी करणेकामी नियुक्त केलेल्या पडताळणी समितीचा अहवाल स्विकारून त्रुटी पूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर नवीन विषयाचे संलग्निकरण पुढे चालु ठेवण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
